# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः02.03.2026** **वारःसोमवार**

---

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज दिल्ली लखपती बिटिया योजनेचा शुभारंभ
- पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि कॅनडाचे राष्ट्राध्यक्ष मार्क कार्नी यांच्यात आज शिष्टमंडळस्तरीय चर्चा
- इराणविरुद्ध अमेरिका-इस्रायलच्या संयुक्त कारवाया सुरूच आणि
- टी20 विश्वकरंडक स्पर्धेत भारताची उपांत्य फेरीत धडक

**राष्ट्रपतीलखपती**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते दिल्ली लखपती बिटिया योजनेचा आज शुभारंभ होणार आहे. सध्याच्या लाडली योजनेचे नामांतर आणि विस्तार योजनेमध्ये करण्यात आला आहे. नव्या योजनेची आर्थिक आणि दृष्टीकोन दोन्ही स्तरावर व्याप्ती वाढवण्यात आली असून, त्याचा लाभ एक लाख २० हजार रुपयांपेक्षा अधिक वार्षिक वेतन नसलेल्या आणि तीन वर्षांपासून दिल्लीत रहिवासी असलेल्या कुटुंबांना होणार असल्याची माहिती दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांनी दिली आहे.

पूर्वीच्या तरतुदींनुसार, रुग्णालयात जन्म झालेल्या पात्र मुलीसाठी ११ हजार आणि घरी प्रसुती झाल्यास दहा हजार रुपये खात्यात जमा होत असत तसंच इयत्ता पहिलीपासून महत्त्वाच्या शैक्षणिक टप्प्यांसाठी प्रत्येक पाच हजार रुपये जमा केले जात होते.

**पंप्रकॅनडासंवाद**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि कॅनडाचे राष्ट्राध्यक्ष मार्क कार्नी यांच्यादरम्यान दिल्लीत आज शिष्टमंडळस्तरीय चर्चा होणार आहे. उभय देशांच्या धोरणात्मक भागीदारीचा सर्वंकष आढावा दोन्ही नेते घेणार आहेत. तसंच सध्या व्यापार आणि गुंतवणूक, ऊर्जा, महत्त्वाची खनिजे, कृषी, शिक्षण, संशोधन आणि नवोन्मेष यांसह परस्पर लोकसंपर्क या प्रमुख सहकार्य क्षेत्रांचा आढावा घेतील. उभय नेते आज दुपारी होणाऱ्या भारत-कॅनडा मुख्य कार्यकारी अधिकारी देखील उपस्थित राहाणार आहेत. भारत -कॅनडा द्विपक्षीय संबंधांचे सामान्यीकरण करण्याच्या महत्त्वाच्या टप्प्यावर ही भेट होत असल्याचं आकाशवाणीच्या वार्ताहरानं कळवलं आहे. दोन्ही नेत्यांनी परस्पर चिंतेच्या बाबी, संवेदनशीलता, आंतरलोक संबध आणि वाढती आर्थिक पूरकता यांवर आधारित रचनात्मक आणि संतुलित भागीदारी पुढे नेण्याचे मान्य केले आहे.

**सुरक्षासमितीपंप्र**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दिल्ली निवासस्थानी, त्यांच्या अध्यक्षतेखाली सुरक्षाविषयक मंत्रिमंडळ समितीची बैठक काल झाली. यामध्ये गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर आणि अर्थमंत्री निर्मला सीतारमण सहभागी झाले होते. इराण, इस्रायल -अमेरिका यांच्या वाढत्या संघर्षांच्या पार्श्वभुमीवर सुरक्षा आणि धोरणात्मक बाबींवर बैठकीत चर्चा झाली.

**<u>पंप्रनेत्यन्याहू</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इस्रालयचे पंतप्रधान नेत्यन्याहू यांच्याशी आखाती प्रदेशातल्या परिस्थितीबाबत काल संवाद साधला. समाज माध्यमांवर लिहिलेल्या संदेशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सद्यस्थितीविषयी चिंता व्यक्त करताना, सामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यावर भर दिला. युद्ध लवकर संपवण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली.

**<u>पंप्रयुएई</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल संयुक्त अरब अमिरातीचे राष्ट्राध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेद अल नाहयान यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला. युएईवर केलेल्या हल्ल्यांचा मोदींनी तीव्र निषेध करताना या हल्ल्यात झालेल्या जीवितहानीबद्दल शोक व्यक्त केला. या कठीण काळात भारत युएईसमवेत एकजुटीने उभा असल्याचं सांगून, अमिरातीतील भारतीय समुदायाची काळजी घेतल्याबद्दल त्यांनी राष्ट्राध्यक्षांचे आभार मानले. मोदींनी समाज माध्यमांवरून लिहिलेल्या संदेशात, प्रदेशातील तणाव कमी करून प्रादेशिक शांतता, सुरक्षा आणि स्थिरतेला भारताचा कायम पाठिंबा असेल असं नमूद केलं आहे.

दरम्यान, युएईने, तेहरानमधील आपला दूतावास बंद करण्याची घोषणा केली असून, तिथल्या राजदूतांना मायदेशी परत बोलवण्याची घोषणा केली आहे.

**<u>नागरीउड्डाण</u>**

आखाती प्रदेशातल्या युद्धसंघर्षाच्या पार्श्वभुमीवर, केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्रालयाअंतर्गत, प्रवास सहायता नियंत्रण कक्षाकडून हवाई प्रवाशांच्या तक्रारी आणि शंकाचे निराकरण सक्रियतेने केले जात आहे. मंत्रालयाने समाज माध्यमांवरील संदेशात दिलेल्या माहितीनुसार, नियंत्रण कक्षाने आत्तापर्यंत ४११ प्रवाशांच्या तक्रारींचे निराकरण केले आहे. या प्रवाशांच्या तक्रारींचे बारकाईने निरीक्षण करून त्याचे निराकरण करण्यासाठी प्राधान्य दिले जात असल्याचं मंत्रालयानं नमूद केलं आहे. प्रवाशांना मदतीसाठी भारतीय दूतावासांनी जारी केलेल्या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. प्रवासी मंत्रालयाच्या अधिकृत ,समाज माध्यम मंचावर,एअरसेवा पोर्टलद्वारे किंवा ०११-२४ ६० ४२ ८३ आणि ०११-२४ ६३ २९ ८७ या हेल्पलाइन क्रमांकांवर संपर्क साधून मदतीसाठी संपर्क साधू शकतात.

**<u>अमेरिकासैनिक</u>**

इराणविरुद्धच्या अमेरिकेच्या कारवाईत अमेरिकेचे तीन सैनिक ठार झाले तर पाच जण गंभीर जखमी झाले असल्याचं अमेरिकन सैन्याने म्हटले आहे. सेंट्रल कमांडने ऑपरेशन एपिक फ्युरीचा भाग म्हणून

इतर अनेक सैनिक जखमी झाले असून, ते लवकरच कर्तव्यावर पुन्हा रुजू होतील असेही अमेरिकन सैन्याने म्हटलं आहे.

**<u>इराणमुख्यालय</u>**

अमेरिकेच्या लष्कराने इराणवर केलेल्या हल्ल्यात इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सचे मुख्यालय उद्धवस्त केल्याची पुष्टी केली आहे. अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने दिलेल्या निवेदनामध्ये या कारवाईचे वर्णन सापाचे डोके उडवणे असं केलं आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनल्ड ट्रम्प यांनी अमेरिकन लष्कराने, इराणची ९ नौदल जहाजे नष्ट केल्याचे सांगून, उर्वरीत नौदल जहाजांचा पाठलाग केला जात असून लवकरच त्यांना जलसमाधि दिली जाईल असं ड्रम्प यांनी म्हटलं आहे.

तर इस्रालयच्या लष्कराने इराणच्या गुप्तचर मुख्यालय, हवाई दल कमांड केंद्र, अंतर्गत सुरक्षा मुख्यालयांसह डझनभर इराणी लष्करी कमांड सेंटरवर हल्ला केल्याचे वृत्त आहे. इस्रायलकडून देण्यात आलेल्या निवेदनानुसार, इराणच्या कमांड अँड कंट्रोल क्षमतेला धक्का बसला असून, महत्त्वाच्या सुविधांमधील कर्मचारीही मृत्यूमुखी पडले आहेत. खोमेनी यांच्या मृत्यूनंतर कालही अमेरिका-इस्रायलच्या संयुक्त कारवाया सुरूच होत्या. दरम्यान, खोमेनी यांच्या हत्येनंतर इराणचे ज्येष्ठ धर्मगुरू अयातुल्ला अलिरेझा अराफी देशाचे अंतरिम सर्वोच्च नेते म्हणून काम पाहाणार आहेत. इराणच्या संविधानातील कलम १११ नुसार आपत्कालीन नेतृत्व व्यवस्था सुरू झाल्यानं तीन सदस्यीय अंतरिक नेतृत्व परिषद कारभार पाहाणार असून, अराफी परिषदेचे न्यायतज्ज्ञ सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आले आहेत.

**<u>अमेरिकाइराणई३देश</u>**

ब्रिटन, फ्रान्स आणि जर्मनी या तीन देशांच्या नेत्यांनी इराणचा क्षेपणास्त्र हल्ला अविवेकी आणि तारतम्य न बाळगता केल्याचं म्हटलं आहे. युरोपियन महासंघातील या तीन महत्त्वाच्या देशांनी संयुक्त निवेदनात अमेरिकेला पाठिंबा दिला असून, इराणच्या हल्ल्यानंतर या प्रदेशातील हिताचे रक्षण करण्यासाठी पावले उचलण्यास तयार असल्याचे म्हटलं आहे. या संदर्भात अमेरिका आणि मित्र राष्ट्रांसमवेत एकत्रित काम करण्याची सहमतीही या निवेदनात दर्शवली आहे. ब्रिटनचे पंतप्रधान केअर स्टारमर यांनी चित्रफित संदेशाद्वारे इराणी क्षेपणास्त्र हल्ल्याविरुद्ध बचावासाठी ब्रिटिश तळांचा वापर करण्याची परवानगी अमेरिकेला दिली आहे.

**<u>तेलकिंमती</u>**

आखातातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, जागतिक पातळीवर कच्च्या तेलाच्या किंमतीत वाढ झाली आहे. आशियातील ऊर्जा बाजारात कच्च्या आणि लाईट स्वीट तेलामध्ये दहा टक्क्यांहून अधिक वाढ झाल्याची नोंद झाली आहे.

**<u>साखरमहा</u>**

सध्या सुरू असलेल्या साखर हंगामात महाराष्ट्र उत्तर प्रदेशला मागे टाकत, देशातील अव्वल साखर उत्पादक राज्य म्हणून उदयास येण्याची अपेक्षा आहे. इस्मा म्हणजेच भारतीय साखर आणि जैव ऊर्जा उत्पादक

संघटनेने जाहीर केलेल्या तिसऱ्या सुधारित अंदाजानुसार देशातील एकंदर साखर उत्पादन ३२ पूर्णांक ४ दशलक्ष टन होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यापैकी महाराष्ट्राचे योगदान ११ पूर्णांक ८ दशलक्ष टन तर उत्तर प्रदेशचे थोडे कमी पावणे दहा दशलक्ष टन होण्याचा अंदाज आहे.

**<u>वाराणसीवृक्षारोपण</u>**

उत्तर प्रदेशमध्ये वाराणसीच्या सुजाबाद डोमारी भागात काल वृक्षारोपण मोहिमेदरम्यान, स्थानिकांनी एक तासात सुमारे अडीच लाख रोपे लावली. त्यामुळे चीनच्या नावावरचा विक्रम मोडला आहे. यावेळी गिनिज वर्ल्ड रेकॉर्डचे न्यायाधीश ऋषीनाथ यांच्या हस्ते महापौर अशोक कुमार आणि महापालिका आयुक्त हिमांशु नागपाल यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. चीनमधील हेनान प्रांतात २०१८मध्ये एकाच वेळी दीड लाख रोपे लावण्याचा विक्रम नोंदवण्यात आला होता. डोमारीच्या वृक्षारोपण मोहिमेत ड्रोन कॅमेरा आणि आधुनिक डिजीटल मोजणी प्रणालीद्वारे पडताळणी केल्यानंतर नव्या विक्रमाची घोषणा करण्यात आली.

**<u>महिलाहॉकी</u>**

एफआयएच विश्वकरंडक 2026 पात्रता फेरीसाठी भारतीय महिला हॉकी संघ काल हैदराबाद इथं दाखल झाला. बंगळुरूतील महिनाभर सराव शिबिर पूर्ण करून संघ इथे आला आहे. येत्या ८ मार्च ते १४ मार्चपर्यंत ही पात्रता फेरी होणार आहे. भारताचा समावेश ब गटात झाला असून, भारताचा पहिला सामना ८ मार्च रोजी उरुग्वेविरुद्ध खेळणार आहे.

**<u>क्रिकेट</u>**

क्रिकेट टी20 विश्वकरंडकाच्या सुपर एट सामन्यात काल भारतानं वेस्ट इंडिजला नमवून उपांत्य फेरीत धडक मारली. अत्यंत चुरशीच्या या सामन्यात वेस्ट इंडिजनं दिलेलं 195 धावांचं आव्हान भारतानं चार चेंडू राखून पार केलं. उपांत्य फेरीत प्रवेश करण्यासाठी भारताला हा सामना जिंकणं आवश्यक होतं.

भारतानं काल नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण स्वीकारलं. वेस्ट इंडिजनं 20 षटकात 4 गड्यांच्या मोबदल्यात 195 धावा केल्या. जसप्रीत भुम्ब्रानं 2 बळी मिळवले. भारताच्या संजू सॅमसननं केलेल्या नाबाद 97 धावा निर्णायक ठरल्या. त्याला सामनावीर घोषित करण्यात आलं.

भारताचा उपांत्य फेरीचा सामना 5 तारखेला गुरुवारी इंग्लंडबरोबर मुंबईत होणार आहे. उपांत्य फेरीचा दूसरा सामना दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड यांच्यामध्ये होणार आहे.

# या बरोबरच हे बातमीपत्र संपलं नमस्कार.